# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार दि.१४/०६/०७ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | मा.श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्या |
| ३) | मा. ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | मा.डॉ.बी.बी.कदम शिक्षण संचालक, कोल्हापूर | सदस्य |
| ५) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ६) | डॉ. आर. आर. पाटील, संचालक म. व. वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ७) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ८) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ९) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १०) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ११) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| १२) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १३) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १४) | प्राचार्य बी. पी. रोंगे | सदस्य |
| १५) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १६) | मा.श्री.जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १७) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १८) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १९) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| २०) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

सभेच्या सुरुवातीस मा. सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले त्यानंतर सभेस कार्यक्रमपत्रिकेतील विषयांच्या क्रमानुसार सुरुवात झाली.

**विषय क्र. [ १ ]** **दि. ११ एप्रिल २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

ठराव क्र. [ १ ] **दि.११ एप्रिल, २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. १ वर, ठराव क्र. १ मध्ये क्र. (२) मधील पहिल्या ओळीमध्ये विद्यापीठाने या शब्दानंतर "लागू असलेल्या" आणि तिसऱ्या ओळीमध्ये सर्व या शब्दानंतर "लागू असलेल्या" अशी दुरुस्ती करण्यात आली.**

**२) ठराव क्र. ११ ला अनुसरुन, यापुढे करार (MoU) करण्यापूर्वी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी.**

[कृ.मा.प.]

विषय क्र. [ २ ] **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल**

ठराव क्र. [ २ ] **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेपुढे दि. १२ एप्रिल, २००७ पासून १३ जून, २००७ पर्यंतचा अहवाल सादर केला. याची व्यवस्थापन परिषदेने खालील दुरुस्तीसह नोंद घेतली आणि यापुढे मा.कुलगुरुंचा अहवाल कार्यक्रमपत्रिकेसोबतच देण्यात यावा असे ठरले.**

**०) पहिल्या पानावरील प्रशासकीय विभाग या सदराखालील तिसऱ्या परिच्छेदामध्ये "भूमिअभिलेख" ऐवजी "भूसंपादन अधिकारी" अशी दुरुस्ती करावी.**

**०) "प्राचीन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग" याऐवजी "प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग" अशी दुरुस्ती करावी.**

विषय क्र. [ ३ ] **संगणक, प्रिंटर व विविध प्रकारचे फर्निचर इ. खरेदी संदर्भात मा. कुलगुरुंनी केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

टिपणी:- प्रशासकीय व अधिविभासाठी विविध प्रकारचे फर्निचर, संगणक व प्रिंटर इ. खरेदीचा प्रस्ताव दि. २९/०६/२००६ व दि. २८/०८/२००६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीत ठेवण्यात आलेला होता. खरेदी समितीने कमीत कमी दर असलेल्या संबंधित फर्मकडून विविध प्रकारचे फर्निचर, संगणक व प्रिंटर खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती. विद्यापीठाकडे नव्याने सुरु करण्यात आलेल्या एम. एड्. अभ्यासक्रमासाठी व एम. सी. ए. कोर्सच्या मागणी नुसार संबंधित फर्मकडून पुर्वीच्याच दराने विविध प्रकारचे फर्निचर, संगणक व प्रिंटर इ. दि. १९/१२/२००६ व दि. २२/१२/२००६ च्या टिपणीवर अनुक्रमे रुपये १,३३,६००/- व रुपये ३,४६,४००/- मा. कुलगुरुंनी खरेदी समिती व वित्त व लेखा समितीच्या वतीने मान्यता दिली आहे, त्यानुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव क्र. [ ३ ] **मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**यापुढे संगणक व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू खरेदी करताना नविन निविदा मागवून खरेदी करावी.**

**यापुढे असेही ठरले की, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना लॅपटॉप देण्याबाबत शासनाकडून मान्यता घ्यावी तसेच लॅपटॉप विकत घेण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यालयाने प्रयत्न करावेत.**

**विषय क्र. [ ४ ] ॲड. अशोक ठोकडे यांच्या कायदा सल्ल्या बाबतचे मानधन तसेच सुधारित शुल्क ठरविणे बाबत..**

टिपणी :- ॲड. अशोक ठोकडे यांच्या कायदा सल्ल्या बाबतचे मानधन तसेच सुधारित शुल्क ठरविणे बाबतचा प्रस्ताव दिनांक ४/०४/२००७ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये ठेवला असता ॲड. अशोक ठोकडे यांना मानधन दरमहा रुपये ३,०००/- व शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. आस्थापना / ३५८१ / दि. १०/१०/२००२ अन्वये शुल्क पुर्वलक्षी प्रभावाने मंजूरीची शिफारस करण्यात आली.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ४ ] विद्यापीठ स्थापनेपासून पूर्वलक्षीप्रभावाने पान क्र. २५ वरील तक्त्याप्रमाणे कायदा सल्ल्याबाबतचे मानधनाचे शुल्क मान्य करण्यात यावे असे ठरले.**

**विषय क्र. [ ५ ] प्रकल्पाच्या अधिव्यय च्या वाटपाबाबत स्थापन केलेल्या उपसमितीच्या अहवालावर मा. कुलगुरुंनी केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर..**

टिपणी : - प्रकल्पाच्या अधिव्यय च्या वाटपाबाबत स्थापन केलेल्या उपसमितीच्या अहवालावर मा. कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीचा प्रस्ताव दि. ४/०४/२००७ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये ठेवला असता उपसमितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली.

सबब, सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [ ५ ] मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि पान क्र. ३३ वर क्र. ६ मधील "उपकरणे" शब्द वगळून "पूरक साहित्य" अशी दुरुस्ती करण्यात यावी असे ठरले.**

**विषय क्र. [ ६ ] सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधाचा शासन निर्णय क्र. एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५, दि. ११ मे, २००७ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व माहितीस्तव सादर.**

टिपणी :- सोबत शासन निर्णय क्र. एसयुएस-२००५/(१२३/०५)/विशि-५, दि. ११ मे, २००७ जोडला असून या शासन निर्णयान्वये सोलापूर विद्यापीठास १५० शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध शासनाने मंजूर केला आहे. त्यामध्ये पूर्वीची ४१ व नव्याने निर्माण करण्यात आलेल्या १०९ पदांचा समावेश आहे. नव्याने निर्माण करण्यात आलेली पदे शासनाने आर्थिक तरतूद मंजूर केल्यानंतरच भरावीत अशा सूचना दिलेल्या आहेत आणि पूर्वीच्या ४१ पदांमधील रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे. सध्या सरळसेवा आणि पदोन्नतीने पदे भरतीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. नवीन व जुन्या पदांची भरती प्रक्रिया दोन टप्प्यात करावी लागेल त्यामध्ये वर्ग १ व २ मधील पदांची जाहिरात देवून प्रमाणसंहितेमधील तरतूदीनुसार ५०% पदावर पदोन्नतीसाठी कर्मचारी उपलब्ध नसतील तर जेवढे कर्मचारी उपलब्ध आहेत, त्यांना पदोन्नती देवून उरलेली सर्व पदे जाहिरातीने भरावीत आणि त्यास सरळसेवेचे आरक्षण निश्चित करुन सामान्य प्रशासन विभागातंर्गत मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेऊन पुढील कार्यवाही करावी असे मनुष्यबळ नियोजन समितीने सुचविले आहे. याच शासन निर्णयातील प्रपत्र अ मधील पद क्र. ७ ते २९ पर्यंतची नव्याने निर्माण केलेली व जी नियमित व कंत्राटी पध्दतीने

**[कृ.मा.प.]**

भरण्यास उपलब्ध होतील अशी पदे भरण्याची कार्यवाही दुसऱ्या टप्प्यात करावी असेही समितीने सुचविले असून वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी कर्मचारी उपलब्ध असतील त्या सर्वांना प्रमाणसंहितेतील नियमानुसार पदोन्नती द्यावी व पदोन्नती देण्यासाठी खाली कर्मचारी उपलब्ध नसतील तर उरलेली सर्व पदे एकत्र करुन सरळसेवा पध्दतीने त्यांचे एकत्रित आरक्षण निश्चित करुन जाहिरातीद्वारे भरण्याची प्रक्रिया सुरु करावी असे सुचविले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व माहितीस्तव सादर.

**ठराव क्र. [ ६ ] शासन निर्णयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि विषय आणि टिपणीतील नियोजन मान्य करण्यात यावे असे ठरले. तसेच समित्यांची व सदस्यांची नांवे वेबसाईटवर टाकावीत**

**विषय क्र. [ ७ ] जून २००७ पासून सोलापूर विद्यापीठामध्ये दोन नवीन शैक्षणिक विभाग अनुदान तत्त्वावर सुरु करण्यास व नवीन १६ शिक्षकी पदांना शासनाची परवानगी मिळाल्याची बाब माहितीसाठी व मान्यतेसाठी.**

टिपणी: - सोलापूर विद्यापीठामध्ये १. गणित व संख्याशास्त्र २. प्राचीन इतिहास संस्कृती व पुरातत्व शास्त्र हे दोन नवीन विभाग अनुदान तत्त्वावर सुरु करण्याची व सदरचे दोन विभाग अनुदान तत्त्वावर सुरु करावयाच्या प्रस्तावाच्या अनुशंगाने नवीन १६ शैक्षणिक पदांना शासनाची पत्र क्र. एसयुएस / २००५ / (०८/०५) विशि - ५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दि. ११ मे, २००७ च्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे. सदरचे विभाग जून २००७ पासून विद्यापीठामध्ये अनुदान तत्त्वावर सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर..

**ठराव क्र. [ ७ ] शासन निर्णयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि गणित व संख्याशास्त्र आणि प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व शास्त्र विभागातील शिक्षकी पदे शासनाच्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून भरण्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. [ ८ ] सन २००६-२००७ या वर्षाकरिता वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी समिती नियुक्त करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सन २००६-२००७ या वर्षाकरिता वार्षिक अहवाल तयार करण्यात येणार आहे. सदरच्या अहवालास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (क क) नुसार मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर अहवाल तयार करण्याकामी समिती नियुक्त करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. [ ८ ] सन २००६-२००७ या वर्षाकरिता वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती नियुक्त करण्यात यावी असे ठरले.

१) श्रीमती एन. व्ही. साठे - अध्यक्षा.
२) डॉ. डी. डी. रणनवरे - सदस्य.
३) डॉ. बी. एस. कोनापूरे - सदस्य.
४) डॉ. सुहास पुजारी - सदस्य.
५) श्री. एम. के. कौरथी - सदस्य.
६) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.
७) डॉ. पी. बी. कुंभार - सचिव.

तसेच यापुढे अहवालात चार हुतात्म्यांच्या छायाचित्राचा समावेश करण्यात यावा असे ठरले.

विषय क्र. [ ९ ] सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्ती यांच्या तारखा निश्चित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..

टिपणी : - सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र प्रारंभाच्या तारखा सोबत जोडलेल्याप्रमाणे सर्व महाविद्यालयांना कळविलेल्या आहेत. तसेच प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्तीच्या तारखा निश्चित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर..

ठराव क्र. [ ९ ] सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी विविध विद्याशाखांसाठी प्रथम सत्र समाप्ती व व्दितीय सत्र प्रारंभ व समाप्ती यांच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यास मान्यता द्यावी असे ठरले.

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | व्दितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| अ)कला,वाणिज्य, विज्ञान,सामाजिक शास्त्रे, विधी | १२ जून २००७ | २८/१०/२००७ | २७/११/२००७ | ३०/०४/२००८ |
| ब)पदव्युत्तर अभ्यासक्रम (फक्त विद्यापीठातील अधिविभाग) | ५ जून २००७ | १/११/२००७ | २७/११/२००७ | ३०/०४/२००८ |
| अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी | २ जुलै २००७ | ३०/११/२००७ | २०/१२/२००७ | १३/०५/२००८ |
| व्यवस्थापन अभ्यासक्रम (एम.बी.ए., डी.बी.एम., एम.एस.डब्ल्यू. इ.) | २ जुलै २००७ | ३०/११/२००७ | २०/१२/२००७ | १३/०५/२००८ |
| बी.एड./ एम.एड. | २ जुलै २००७ | ३०/११/२००७ | २०/१२/२००७ | १३/०५/२००८ |

**विषय क्र. [ १०] जून २००७ पासून सोलापूर विद्यापीठामध्ये एम. पी.एड. विभाग सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..**

टिपणी: - सोलापूर विद्यापीठामध्ये शै. वर्ष २००७ पासून एम. पी. एड. या विभाग सुरु करण्यास प्रस्ताव विद्यापरिषदेने दि. ५ जून, २००७ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १७ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ शिफारस केलेली आहे. सदरचा विभाग विद्यापीठामध्ये सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. [ १० ] एम. पी. एड. विभाग सुरु करण्याचा संपूर्ण प्रस्ताव पुन्हा तयार करुन सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ११] जून २००७ पासून नव्याने सुरु होणाऱ्या पदव्युत्तर प्रयोगशाळाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: - सोलापूर विद्यापीठाकडे जून २००७ पासून पदव्युत्तर प्रयोगशाळा मान्यतेचे प्रस्ताव सोबत जोडलेल्याप्रमाणे आलेले होते. सदरचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) प्रमाणे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या विचारार्थ ठेवले असता सदरच्या एकूण ९ प्रस्तावापैकी ७ प्रस्तावाकरिता स्थानिक चौकशी समितीने भेट देवून अहवाल सादर केलेला आहे. सदरच्या अहवालातील शिफारशी सोबत जोडल्या प्रमाणे आहेत. ज्या महाविद्यालयांना पदव्युत्तर प्रयोगशाळेस मान्यता देण्याची शिफारस स्थानिक चौकशी समितीने केलेली आहे त्या महाविद्यालयांना स्थानिक चौकशी समितीने सुचिवलेल्या अटींची पुर्तता करण्यास कळविलेले आहे. उर्वरित संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा मान्यतेकरिता स्थानिक चौकशी समिती पाठविण्याची कार्यवाही चालू आहे.

तसेच शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड या महाविद्यालयाने पीएच.डी प्रयोगशाळा मान्यता मागितलेली आहे. तथापि महाराष्ट्र शासनाने पदव्युत्तर प्रयोगशाळांना मान्यता देताना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ अन्वये नवीन महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाना मान्यता देण्याची कार्यपध्दती नमूद केली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ (२) प्रमाणे सध्या संलग्नित असलेल्या विद्यापीठाचे ना हारकत प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. तसेच सदरचे महाविद्यालय विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राबाहेरील असल्याने सदरच्या प्रस्तावाकरिता स्थानिक चौकशी समिती पाठविलेली नाही. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

तसेच महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. नविम २००७ / (७२ / ०७) मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे दि. २० एप्रिल, २००७ च्या पत्रान्वये एम. फील./ पीएच. डी संशोधन केंद्र सुरु करणे शासनाची परवानगी घेण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ नुसार नवीन महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना मान्यता देण्याची कार्यपध्दती नमूद केली आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. सदरच्या बाबी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी..

**ठराव क्र. [११]** **महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीनुसार कायद्याच्या तरतुदीस अधीन राहून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**तसेच शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, कराड. या महाविद्यालयाची प्रयोगशाळा शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत येत असल्याने शिवाजी विद्यापीठाकडून ना हरकत प्रमाणपत्र मागवून घेऊन नंतर हा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ १२]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १२ (१) (अ) नुसार कुलगुरुच्या नियुक्तीसाठी नावांची शिफारस करण्याच्या समितीवर व्यवस्थापन परिषदेने एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ..**

टिपणीः- सोलापूर विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या क्र. युएसजी १००४ (९४ / २००४) / युएनआय -१ दि. २२ जुलै २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार झालेली असून याच अधिसूचनेनुसार विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून डॉ. इरेश स्वामी यांची पाच वर्षाकरिता किंवा ते वयाची ६५ वर्षे पूर्ण करेपर्यंत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ११२ (a) नुसार नियुक्ती करण्यात आलेली आहे. डॉ. इरेश स्वामी यांनी कुलगुरु पदाचा कार्यभार दि. २४/०७/२००४ रोजी स्वीकारलेला आहे.

दि. १०/०९/२००७ रोजी कुलगुरु यांची वयाची ६५ वर्षे पूर्ण होत आहेत. श्री. विनायक दळवी मा. कुलपती यांचे उपसचिव यांचे सोबतचे पत्र क्र. जा.क्र CS/ Solp/ AVC- १/ (६५४३) /१४५५ दि. ७/५/०७ अन्वये आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १२ (१) (अ) (४) नुसार व (ब) नुसार विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी संबंधित नसलेल्या व्यक्तीचे कुलगुरुंच्या नियुक्ती समितीवर व्यवस्थापन परिषदेने एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [१२ ]** **व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १२ (१) (अ) (चार) नुसार खालील सदस्याचे अनुक्रमे नामनिर्देशन केले.**

**०) डॉ. के. बी. पोवार**
**०) डॉ. एस. ए. सुर्यवंशी**

**<u>आयत्या वेळेचे विषय :-</u>**

**विषय क्र.[१३]** **प्राचार्य कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कॅड / कॅम मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या लॅबला मान्यता देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाकडे जून २००७ पासून कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कॅड / कॅम या मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या लॅबला रिसर्च लॅब म्हणून मान्यता मिळण्याकरिता महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरच्या प्रस्तावाकरिता मा. कुलगुरु यांनी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या वतीने व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ शिफारस केलेली आहे.

सदरच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानंतर सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात येईल. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर...

**[कृ.मा.प.]**

ठराव क्र. [ १३ ] **प्राचार्य कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कॅड / कॅम मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या प्रयोगशाळेस मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र.[१४] सांगोला महाविद्यालय, सांगोला नैसर्गिक वाढीसाठी बी. सी. एस. अभ्यासक्रमास मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

ठराव क्र. [ १४ ] **सांगोला महाविद्यालय, सांगोला नैसर्गिक वाढीसाठी बी. सी. एस. अभ्यासक्रमास मान्यता द्यावी असे ठरले.**

मा.कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**

**[कृ.मा.प.]**